PlanetRead

Literacy for a Billion

Movie: Khar Kadhi Bolu Naye
Year: 1987

Song: Oth Aatur Jhale Kashala
Lyricist: Sudhir Moghe

ओठ आतूर झाले कशाला
कुणी सांगायचे रे कुणाला
हो... ओठ आतूर झाले कशाला
कुणी सांगायचे रे कुणाला
का उतावीळ हा जीव झाला
का उतावीळ हा जीव झाला
कुणी सांगायचे गं कुणाला
कुणी सांगायचे गं कुणाला
तू मला अन्‍ मी तुला

प्राण माझा उगा बावरी का
प्राण माझा उगा बावरी का
हे तनु ला भरे कापरे का
हे तनु ला भरे कापरे का
ओढ लागे कशाची
हो... ओढ लागे कशाची मनाला
कुणी सांगायचे गं कुणाला
कुणी सांगायचे रे कुणाला
तू मला अन्‍ मी तुला

मी न भुललो कुणाला कधीही
मी न भुललो कुणाला कधीही
गुंतलो ना कधीही कुठेही
गुंतलो ना कधीही कुठेही
भूल पडली कशी या
हो... भूल पडली कशी या क्षणाला
कुणी सांगायचे रे कुणाला
कुणी सांगायचे गं कुणाला
मी तुला अन्‍ तू मला

हो... आ...
ला...
दोन नजरा परी एक तेज
दोन ह्रदये परी एक गूज
दोन नजरा परी एक तेज
दोन ह्रदये परी एक गूज
कोणते नाव दयावे तयाला
कोणते नाव दयावे तयाला
कुणी सांगायचे गं कुणाला
कुणी सांगायचे कुणाला
तू मला अन्‍ मी तुला
तू मला अन्‍ मी तुला
तू मला अन्‍ मी तुला
ला...
ला...

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*